महाराष्ट्र शासन
## जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
शाखा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), (अ.व.प्र.) लाभक्षेत्र क्र. २, अमरावती
दुरध्वनी क्रमांक - ०७२१-२६६४८१९ फॅक्स क्र. ०७२१-२६६२८४३
Email :- mwpdyc@gmail.com Website:-http://amravati.nic.in

क्र.मं.अ./विभूसअ.(अवप्र)क्र.२/कावि-१९०५/२० दिनांक : ९ सप्टेंबर, २०२०

## खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत.

## - जाहीर नोटीस -

**वाचा :-** १) शासन निर्णय महसुल व वनविभाग क्र.संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दि. १२/०५/२०१५.
२) शासन निर्णय महसुल व वनविभाग क्र.संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दि. ३०/०९/२०१५.
३) म.शा.महसुल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२/ मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक २५/०१/२०१७.

सरळ खरेदी प्र.क्र.१७/४७/२०१९-२०,
**मौजा - अंतरगांव,**
तालुका - अचलपूर,
जिल्हा - अमरावती.

ज्याअर्थी कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांनी **करजगांव लघु प्रकंल्पाचे कामाकरीता** या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.०३/२०१५/प्र.अ.३४/अ-२, दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे पत्र क्र. जा.क्र.२६८/अमप्रवि/रेशा/करजगांव/२०२०, दिनांक १४/०१/२०२० नुसार **सरळ खरेदी प्रस्ताव १७/४७/२०१९-२० मौजा अंतरगांव, ता. अचलपूर, जि. अमरावती एकूण क्षेत्रफळ ० हे. ०७ आर.** चा प्रस्ताव जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणी ज्याअर्थी, जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेश पत्र क्र. अ.का./प्र.अ./भूसंपादन/कावि-६१/२० प्राप्त दिनांक २३/०१/२०२० अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसुल व वनविभाग क्र.एलक्युएन-०१/२०१७/ प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी आता

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), (अवप्र) लाभक्षेत्र क्र.२ अमरावती तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती अमरावती याव्दारे,

## अनुसूची (एक)

खाजगी क्षेत्रातील जमीनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि

## अनुसुची (दोन)

**करजगांव लघु प्रकल्पाचे कामाकरीता** जमीनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने संपादीत करतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूमिसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्यूल १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमीनीसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

## अनुसूची (तीन)

संबंधित भूधारकाकडुन शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करुन देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णत: अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

२) संबंधीत भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

४) सदर रस्त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखडयाची प्रत कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तीना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (चार)

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक **१७/४७/२०१९-२० मौजा अंतरगांव, ता. अचलपूर,** जिल्हा अमरावती **करजगांव लघु प्रकल्पाचे कामाकरीता** समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमीनीचा तपशील

| अ. क्र. | भूधारकांचे नाव | मौजा | गट/सर्व्हे क्र | भूधारणा प्रकार | नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गणपत कालुजी रायबोले | अंतरगांव | २३/६ | २ | ०.०७ | ०.०७ |
| | एकूण | | | | ०.०७ | ०.०७ |

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
(अ.व.प्र.) लाभक्षेत्र क्र.२, अमरावती
तथा सदस्य सचिव.

"बेटी बचाओ, बेटी पढाओ"